# माहिती अधिकार कायद्याअंतर्गत माहितीची हस्त-पुस्तिका

के.बी. भाभा रुग्णालय,
बेलग्रामी रोड, कुर्ला (पश्चिम),
मुंबई – **400 070.**

# प्रकरण- 1

## प्रस्तावना

वैद्यकीय अधिक्षक **डॉ. प्रदीप श्री. आंग्रे**

के. बी. भाभा हॉस्पीटल, कुर्ला(प.)
बेलग्रामी रोड, मुंबई **400 070**

मुंबई महानगरपालिका आपल्या कर्तव्याचा एक भाग म्हणून मुंबई व उपनगरातील नागिरकांना वैद्यकीय सेवा पुरिवत असते. बृहन्मुंबई महानगरपालिकेची मुंबईमध्ये वेगवेगळया परिक्षेत्रांमध्ये एकूण 16 रुग्णालयें आहेत. के.बी. भाभा नगरपालिका साधारण रुग्णालय हे बेलग्रामी रोड, भारत सिनेमाजवळ, कुर्ला(प) येथे आहे व ते अशा परिक्षेत्रीय रुग्णालयांपैकी एक आहे. पूर्व उपनगरातील नागिरकांना सर्व आवश्यक अशी दुय्यम स्तरीय आरोग्य सेवा सुश्रुषा प्रदान करणे हे या रुग्णालयाचे ब्रीद आहे.

तिसाव्या दशकाच्या शेवटच्या कालावधीपर्यंत कजर्तपासून ते कुर्ल्यापर्यंत पसरलेल्या पूर्व उपनगरीय प्रदेशामध्ये नागरी किंवा शासकीय असे रुग्णालय नव्हते. 1885 मध्ये कावसजी जहाँगीर डिस्पेन्सरी या नावाचा एक छोटासा दवाखाना होता जो कुर्ला नगरपालिका कायार्लयाच्या नियंत्रणाखाली होता.

सन 1935 मध्ये महानगरपालिकेने 30 रुग्णांची रहाण्याची व्यवस्था असलेले 'खान बहादूर हॉस्पीटल` या नावाचे एक प्रसुती रुग्णालय स्थापन केले. या प्रसुतीगृहाचे सन 1950 मध्ये सवर्साधारण रुग्णालयामध्ये रुपांतर करण्यात आले व त्यामध्ये बाहेरील रुग्ण विभाग वाढविण्यात आला. सन 1962 पासून त्यामध्ये वैद्यकीय शल्यचि कीत्सा, बालरोग विभाग, एक्सरे, पॅथॉलॉजी हे विभाग वाढिवण्यात आले. भाभा रुग्णालय, कुर्ला हे 306 रुग्णांची सोय असलेले, सामान्यतः सर्व सोयी असलेले दुय्यम स्तरीय असे एक रुग्णालय झाले.

**1.1** सदर हस्तपुस्तिका महाराष्ट्र राज्य माहितीचा अधिकार कायदा क्र. 22 सन 2005 मधील मार्गदर्शीय तत्वांनुसार तक्रार करण्यात आली आहे.

**1.2** हया हस्तपुस्तिकेचा उद्देश सदर रुग्णालयाच्या कामकाजा संबंधित आवश्यक असणारी कार्यप्रणाली व पारदशर्कता जबाबदारी इत्यादिंची जबाबदारी इत्यादींची व्यवहार्य माहिती सवर्सामान्य जनतेस उपलब्ध करुन देणे हा आहे.

**1.3** ही हस्तपुस्तिका सवर्सामान्य जनतेस माहिती मिळावी यासाठी उपलब्ध करण्यात आली आहे.

## <u>उपलब्ध सेवा :</u>

वैद्यकीय
नित्याच्या
बाहय रुग्ण व अंतगर्त रुग्णांसाठी सेवा

- वैद्यकिय
- टी.बी. बाहय रुग्ण
- बालरुग्ण चिकित्सा 1 डोस (लसी करण)
- शल्यिचिकत्सा
- आयसीटीसी एचआयव्ही साठी स्वयंस्फूर्त आणि गोपनीय सल्ला आणि परिक्षा केंद्र
- अस्थिव्यंग विभाग
- पी.पी.टी.सी.टी. विभाग (पालकांकडून बाळास होणा-या संसर्ग (एच्.आय्.व्ही/एड्स)
- कान, नाक, घसा, विभाग
- त्वचारोग तपासणी बाहयरुग्ण विभाग
- नेत्रचिकित्सा विभाग

- अपघात
- प्रसूती विभाग कुटुंब नियोजन विभाग व प्रसुतीपश्वात विभाग
- प्रसुतिपूर्व सेवा
- लोक सेवा संगम (कुष्ठरोग तपासणी विभाग) त्वचारोग तपासणी बाहयरुग्ण विभाग.

## संबंधित / सहाय्यक सेवा :

- इ.सी.जी. विभाग
- औषधालय- औषधांचे भांडार आणि वितरण
- समाज विकास – वैद्यकीय सामाजिक सेवा
- रुग्णवाहिका सेवा
- शवागार विभाग
- स्वयंपाक विभाग

## शैक्षणिक

- अंतगर्त प्रशिक्षण
- स्त्री रोग आणि बालरोग शिक्षणामधील पदविका
- टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस च्या विद्यार्थ्यांसाठी रुग्णालय व्यवस्थापनेचे प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षण
- निरीक्षण नेमणूक - वेगवेगळया वैश्ष्ठियांसाठी
- वैद्यकीय ग्रंथालय

नियमांच्या अधिन राहून नागिरकांनी वरील सेवांचा लाभ घ्यावा ही अपेक्षा आहे, अर्थात रुग्णांची सोय आणि त्यांच्यासाठी आरामदायक वातावरण ही रुग्णालयासाठी प्राधान्याची बाब राहील. या सेवांबाबत नागिरकांकडून सूचना तसेच काही तक्रारी असल्यास त्या स्वागतार्ह रहातील. महत्वाच्या ठिकाणी ठेवलेल्या तक्रार व सूचना पेटयांचा नागिरकांनी वापर करावा.

नागिरक त्या त्या विभागांचे मुख्य पयर्वेक्षक किंवा समाज विकास अधिका-यांशीही या बाबतीत संपर्क साधू शकतील.

ते कर्तव्यावर असलेले वैद्यकीय अधिकारी / वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी / उप वैद्यकीय अधिक्षक आणि वैद्यकीय अधिक्षक यांचीही भेट घेऊ शकतील.

1.4 पुस्तिकेच्या माहितीची रचना


| प्रकरण | अंतर्भूत तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 1 | परिचय | 1-4 |
| 2 | संस्थेची रचना व कार्यप्रणाली | 6-8 |
| 3 | अधिकारी व कमर्चारी यांचे अधिकार व कर्तव्ये | 9-35 |
| 4 | कार्ये पार पाडण्याबाबतचे नियम, ठराव, सूचना, सूचना-पुस्तिका आणि अभिलेख. | 36-43 |
| 5 | कार्यप्रणाली व कामकाजासंबंधित लोकप्रतिनिधींचे विचार विनिमयाकरीता तयार करण्यात आलेल्या व्यवस्थेच विवरण (तपशील) | 44 |
| 6 | नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रकारांची माहिती. | 45 |
| 7 | संस्था, समित्या व अन्य कार्यप्रणालीचे विवरण | 46 |
| 8 | माहिती अधिका-याचे नांव, पदनाम व इतर माहिती | 47 |
| 9 | निर्णय घेण्याच्या प्रक्रीयेमधील कार्यप्रणाली | 48 |
| 10 | अधिकारी व कर्मचारी यांची माहिती संग्रहिका | |
| 11 | प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनविषयक माहिती | 49-65 |
| 12 | प्रत्येक विभाग / कार्यप्रणाली करीता अंदाजपत्रक | 66 |
| 13 | अनुदान कार्यक्रमाअंतगर्त अंमलबजावणीची कार्यप्रणाली | 67 |
| 14 | मंजूरी / सवलती मिळालेल्या लाभार्थीबाबतची माहिती | 68 |
| 15 | कार्यप्रणाली अंमलबजावणीसाठी प्रस्थापित नियम | 69 |
| 16 | इलेक्टॉनिक स्वरुपात उपलब्ध माहिती | 70 |
| 17 | माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी नागिरकांना उपलब्ध असलेल्या सुविधांचा तपशील | 71 |
| 18 | इतर उपयुक्त माहिती | 72-73 |

1.5

व्याख्या

1. नागरी अधिकारी या संज्ञेचा अर्थ,

वैदयकीय अधिक्षक, जे रुग्णालयाचे प्रमुख आहेत.

मुख्य वैदयकीय अधिक्षक हे सर्व उपनगरीय रुग्णालयांचे प्रमुख आहेत.

2. माहिती

रुग्णांसंबंधी रुग्णालयामध्ये असलेले अभिलेख.

1.6

या पुस्तकामध्ये उपलब्ध असलेल्या माहिती बाबत किंवा अतिरिक्त माहिती उपलब्धतेबाबत प्रमुख वैदयकीय अधिकारी आणि प्रमुख वैदयकीय अधीक्षक यांचेशी संपर्क साधणे.

1.7

ज्या व्यक्तीस माहिती हवी आहे त्यांनी लिखित स्वरुपात आवश्यक ते शुल्क भरुन आवेदन पत्र सादर करावे.

सही/-
वैद्यकिय अधिक्षक,
के.बी.भाभा रुग्णालय कुर्ला(प)